NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

# शिक्षणाला माणूस घडविण्याचे साधन बनवा - डॉ. सुनिलकुमार लवटे

सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व डॉ. अनंत ॲन्ड लता लाभसेटवार चॅरिटेबल ट्रस्ट, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने लाभसेटवार व्याख्यानमालेच्या ८ व्या पुष्पाचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्यानाचा विषय "धर्मनिरपेक्ष भारत-आजची गरज" असा होता यासाठी प्रमुख वक्ते प्राचार्य डॉ. सुनिलकुमार लवटे जेष्ठ साहित्यिक व समाजसेवक, कोल्हापूर हे होते. कार्यक्रमाची सुरूवात पाहुण्यांचा सत्कार करून करण्यात आले. यावेळी डॉ. अनंत लाभसेटवार व सौ. लता लाभसेटवार यांचे स्वागत व सत्कार मा. कुलगुरू डॉ. एन. एन.मालदार यांच्या हस्ते करण्यात आले.

जगातील बदल हे विद्यापीठातून झाले आहेत तसेच व्यासंगी शिक्षणातून तरूण पिढी निर्माण झाली तर बदल हा निश्चित होईल असे प्रतिपादन प्रमुख वक्ते डॉ. सुनिलकुमार लवटे, जेष्ठ साहित्यिक व समाजसेवक यांनी केले. भारत धर्मनिरपेक्ष बनविण्यासाठी आपल्या शिक्षणाचा संबंध जडणघडणीशी घालणे आवश्यक आहे. भारत घडविण्यासाठी भारतातील प्राथमिक शिक्षणाचा शैक्षणिक दर्जा उंचावणे आवश्यक आहे. त्यासाठी छोटे छोटे अनुकूल बदल करणे गरजेचे आहे असे सांगत डॉ. सुनिलकुमार लवटे यांनी वेगवेगळया देशातील विकासात्मक बदलांचा आढावा घेतला.

मनुष्यांनी आपल्या रचनेत बदल करावा तसेच आंतरिक बदल करावेत असे आव्हान या व्याख्यानमालेतून करण्यात आले. खरे भारतीय होण्यासाठी स्वत:ला ओळखणे तसेच इतरांचे आदर करणे आवश्यक आहे. आपल्या रोजच्या व्यवहारातून नकारात्मक राजकारणास मुक्त करणे गरजेचे आहे असे मत डॉ. सुनिलकुमार लवटे यांनी मांडले.

या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून मा. प्रा.डॉ.एन.एन.मालदार, कुलगुरू होते. श्री. बी. पी. पाटील, प्र.कुलसचिव, मा. डॉ. अनंत लाभसेटवार व डॉ. लता लाभसेटवार, श्री. आर. वाय. पाटील, बी.सी.यु.डी. संचालक, तसेच सर्व संकुलाचे संचालक, विविध महाविद्यालयाचे प्राचार्य, अध्यापक व प्रशासकीय कर्मचारी हे उपस्थित होते. या व्याख्यानमालेची सुरूवात डॉ. अनंत ॲन्ड लता लाभसेटवार व्याख्यानमालेच्या आढाव्याने झाली. प्रास्तविक व प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. सु.नं.कांबळे, सहायक कुलसचिव यांनी केला. डॉ. अनंत लाभसेटवार यांनी आपल्या मनोगतामध्ये या व्याख्यानमाला आयोजित करण्या पाठीमागचा हेतू स्पष्ट केला.

अध्यक्षीय मनोगतात भारतीय नागरिक म्हणून मनाने आपले कर्तव्य पाळणे आणि एकात्मतेने राहणे ही आजच्या काळाची गरज आहे असे मत मा.प्रा.डॉ.एन.एन.मालदार यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तेजस्विनी कांबळे यांनी केले तसेच या कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी डॉ. सु.नं.कांबळे, सहायक कुलसचिव, श्रीमती. डी. एन. पांढरे, कक्ष अधिकारी, श्री. पी.आर.पुजारी, सहायक कक्ष अधिकारी व श्री. एम.एस.ढवळे, वरिष्ठ लिपिक यांनी परिश्रम घेतले.

---

संदर्भ क्र.सोविसो/कु.का./प्रेसनोट/४४७ दिनांक: १८/०१/२०१७

प्रति,

मा.संपादक,

सोलापूर शहरातील दैनिके.

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात विनामूल्य प्रसिध्द करावी, ही विनंती

आपला विश्वासू,

**( बी. पी. पाटील)**

प्र. कुलसचिव


सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
व
चॅरिटेबल ट्रस्ट


OBILE
ODE


सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
व
डॉ.अनंत ॲण्ड लता लाभसेटवार चॅरिटेबल ट्रस्ट नागपूर
यांच्या संयुक्त विद्यमाने
व्याख्यानमाला
Shri. B.P. Patil